ગુજરાત સંશોધન મંડળનું ત્રૈમાસિક
Journal of The Gujarat Research Society
ISSN: 0374-8588
*Volume 22 Issue 1, January 2020*

# महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक योगदान

**प्रा. डॉ. विठ्ठल रामा जीवतोडे**
गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालय,
उमरखेड जिल्हा यवतमाळ
भ्रमणध्वनी 9404135870
***Email Id.- jiwatode@gsgcollege.edu.in***

प्रास्ताविक

आपल्या देशात सर्वच महापुरुषांनी शिक्षणाला प्रथम प्राधान्य दिलेले आहे. शिक्षणाशिवाय माणूस अपूर्ण असतो. शिक्षणामूळे डोळसपणा येतो. परंतु हा डोळसपणा स्त्री- शूद्रातिशूद्राच्या नशिबात नव्हता. शिक्षणासंबंधीचा हा अधिकार केव्हा हिरावून घेण्यात आला. याची इतिहासात नोंद नाही**. 'विद्येविना मती गेली. मतिविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.'** म्हणणारे महात्मा फुले हे समस्त उपेक्षितांच्या, दलितांच्या सर्व समस्येचे मूळ शिक्षणाच्या अभावात आहे हे ठासून सांगतात.

**शिक्षणाचे प्रयोजन:**

व्यक्तीला भोवतालच्या परिस्थितीचे यथार्थ आकलन होणे हे शिक्षणाचे प्राथमिक प्रयोजन आहे. भ्रामक समजुती व अंधश्रद्धा अशा यथार्थ आकलनाच्या आड येतात. सबब त्यांचे निराकरण शिक्षणातून झालेच पाहिजे, आपल्या वाट्याला आलेले दारिद्रय दास्य, दुःख, अपमान, घृणा, तिरस्कार व अज्ञान यांची जोपर्यंत जाणीवच माणसाला होणार नाही तोपर्यंत त्यांची कारणमीमांसाही करण्याची त्याला बुद्धी होणार नाही आणि ती त्याला करावीशी वाटली तरी त्यासाठी लागणारी कुवतही त्याच्यापाशी असणार नाही, या सर्वांसाठी आपल्या गतजन्मीच्या कर्मानाच तो बोल लावीत बसणार, शिक्षणाद्वारे त्याला या अरिष्टांची जाणीव होईल, त्यांची कारणे मनुष्यनिर्मित आहेत. हे त्याच्या ध्यानात येईल आणि मग त्या कारणांचे निरसन करुन त्या अरिष्टांमधून स्वतःची मुक्ती करुन घेण्याची त्याला प्रेरणा मिळेल अशी जोतीरावांची अपेक्षा होती.

व्यक्तीला सत्य आणि असत्य यातील फरक समजावा, शब्द प्रामाण्यातून तिची सुटका होऊन चिकित्सक दृष्टीकोन तिला लाभावा, आणि वर्तमानाचे तिला यथार्थ ज्ञान व्हावे ही शिक्षणाची प्रयोजने ज्योतीरावांनी सांगितली असली तरी केवळ व्यक्तिनिष्ठ साध्यापुरतीच ती मर्यादित असणे त्यांना मान्य

ISSN: 0374-8588
Volume 22 Issue 1, January 2020

नव्हते. आत्मसुखार्थ ज्ञानाचे संगोपन करणे याखेरीज अधिक व्यापक प्रयोजन जर शिक्षणाला नसेल तर ते शिक्षण स्थितीवादी किंवा प्रतिगामी ठरणे अटळ ठरते याची जोतीरावांना जाणीव होती. शिक्षणातून कशी जाणीवजागृती साध्य होते याचे एक सुंदर उदाहरण धनंजय कीर यांनी फुले चरित्रात नमूद केले आहे.

जोतीराव - सावित्रीबाई यांनी सुरु केलेल्या मुलींच्या शाळेत शिकणारी एक मांगाची मुलगी 'महार, मांगाची अवनत अवस्था' या विषयावर लिहिलेल्या आपल्या निबंधात काही मूलभूत प्रश्न उपस्थित करते असे हे उदाहरण आहे. तिच्या म्हणण्याचा आशय असा आहे. वेदांवर ब्राम्हण लोक मक्ता सांगतात, इतरांना त्यांचा अभ्यास करु देत नाहीत. तेव्हा वेद जर फक्त त्यांचेच असतील तर त्यांनीच आपल्या रोजच्या जीवनात ते अनुसरावेत. आम्हाला धर्मग्रंथाचा अभ्यास करण्याचे स्वातंत्र्य नाही याचा अर्थ उघडच असा आहे की आम्हाला धर्मच नाही. तेव्हा हे ईश्वरा, तूच आम्हाला सांग की ब्राम्हण जसा त्यांचा धर्म आचरणात तसा आम्ही आचारणात आणावा असा कोणता धर्म तू निर्माण केला आहेस ? हा एवढा समजूतदारपणा शिक्षणानेच त्या मुलीच्या ठिकाणी निर्माण केला होता.

'दलितांचे अध्यापनशास्त्र (पेडॅगॉगी ऑफ दि ऑप्रेस्ड) किंवा स्वातंत्र्यप्रित्यर्थ करावयाची सांस्कृतिक कृती (कल्चरल ॲक्शन फॉर फ्रीडम) या पुस्तकांमधून पावलो फ्रिअरी यांनी जो शिक्षणातून सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत मांडला आहे तोच जोतीरावांनाही अभिप्रेत होता असे दिसते, उपेक्षित समाज घटकांना नवविचारप्रवृत्त करुन स्वातंत्र्यासाठी कृतसंकल्प करावे, सामुदायिक संघर्षातून नवा माणूस आणि नवा समाज फ्रिअरी यांनी जो शिक्षणातून सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत मांडला आहे तोच जोतीरावांनाही अभिप्रेत होता असे दिसते, उपेक्षित समाज घटकाना नवविचारप्रवृत्त करुन स्वातंत्र्यासाठी कृतसंकल्प करावे, सामुदायिक संघर्षातून नवा माणूस आणि नवा समाज, घडयावा ही प्रयोजने शिक्षणाने साध्य करावीत असा त्यांचा आग्रह होता त्यांना शिक्षणातून नवसमाजाची उभारणी अभिप्रेत होती. पायावरच कोणतीही संरचना उभी राहत असल्यामुळे पाया जेवढा पक्का तेवढी ती सरचना बळकट ठरते, फक्त वरिष्ठ वर्गीयांच्या उच्च शिक्षणाची काळजी घेणे म्हणजे **'आधी कळस मग पाया'** असा उफराटा प्रकार ठरतो. पीडित दलितांना मुक्त करणारे शिक्षणच नव्या समाजाला खंबीर पाय़ा उपलब्ध करुन देऊ शकेल परिवर्तनाच्या प्रेरणा समाजात जेव्हा खालून वर जातात तेव्हाच त्या अधिक परिणामकारक व टिकाऊ ठरत असतात. प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात जेवढी सार्वत्रिक बंडखोरी होईल. तेवढीच नव्या निकोप न्याय व समताधिष्ठित समाजाची उभारणी सुकर होत असते. म्हणून प्रत्येकाला शिक्षण मिळावे आणि त्या शिक्षणातून शिक्षण घेणाऱ्याच्या सर्जनशील शक्ती जागृत व्हाव्यात अशा अपेक्षा जोतीरावांनी व्यक्त केल्या आहेत

ISSN: 0374-8588
Volume 22 Issue 1, January 2020

शिक्षणातून व्यक्तींना नैतिक सहजीवन साध्य व्हायचे तर यासाठी समाजातील सर्वांना सहजप्रेरणाच्या पातळीवरुन वर उठून बौद्धिक क्षमतांच्या पातळीवर जगण्याची संधी मिळालीच पाहिजे. कुणीही माणूस इतर कुणाचे साधन म्हणून वापरला जाता कामा नये. शोषणाचे साधन म्हणून शिक्षणावर मूठभरांची मिरास राहू नये. मोजक्या लोकाच्या विशेष ज्ञानवत्तेपेक्षा समाजातील सर्वाच्या अंगी स्वतंत्र विचार करण्याच्या क्षमतेचा व निर्णयशक्तीचा शिक्षणातून विकास होणे, या उद्दिष्टाला अग्रक्रम मिळायला पाहिजे.

शाळा खात्यात शुद्र व अतिशुद्र यांच्या मुलांची अक्षम्य आबाळ होते. सर्व जातीच्या मुलांना शिकवण्यासाठी सरकारने नेमलेले पंतोजी धडपणे प्रशिक्षित नसतात. मुळात त्यांची निवडही फारशी कसोशीने केलेली नसते. शुद्रातिशुद्रांच्या मुलांच्या बाबत त्यांचे पूर्वग्रह कायम असतात तेव्हा या कनिष्ठ जातींमधूनच पंतोजी निर्माण करण्याची नितांत आवश्यकता जोतीरावांनी अधोरेखित केली आहे. त्यांच्या मते, जेव्हा त्या त्या जातीचे पंतोजी तयार होतील. ते स्वजातीय मुलांना शिकण्याची गोडी लावतील आणि वेळ व्यर्थ वाया न दवडता आळीपाळीने माळावरती गुरे राखून ते शाळाही करतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

**ब्रिटिश शिक्षणपद्धतीविषयी असमाधानः-**

शूद्र- अतिशूद्रांना ज्ञानाचे दरवाजे खुले करून दिल्याबद्दल इंग्रज राज्यकांप्रती कृत्यज्ञता मनात बाळगत असतानाच महात्मा फुले त्या दोषही परखडपणे त्यांच्या पदरात घालण्यास कचरत नाहीत. उच्च शिक्षणावरच लक्ष केंद्रित करून त्यावर भरपूर पैसा खर्च करण्यामागे राज्यकर्त्याचे सद्हेतू काय असायचे ते असोत. पण त्यातून जनसामान्यांवर मात्र त्यांच्या हातून फार मोठा अन्याय झाला असे जोतीराव फुले गुलामगिरी ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात. राज्यकर्त्यांना मिळणाऱ्या महसूलाचा फार मोठा वाटा रयतेच्या निढळाच्या घामातून निर्माण झालेला असतो. वरिष्ठ- श्रीमंत वर्गाचे त्यातील योगदान नगन्य असते.. अशा परिस्थितीत शासनाने हा पैसा वरिष्ठ वर्गाच्या उच्च शिक्षणावर उधळावा हे त्यांना गैर वाटते. उच्च शिक्षणातून विद्वानांची निर्मिती करावी, पुढे त्यांनी त्यांना मिळालेल्या ज्ञानसंपदेत आपल्या राष्ट्रबांधवाना, कपर्दिकही न घेता, वाटेकरी करून घ्यावे. असा रास्त हेतू कदाचित राज्यकत्यांचा असू शकेल पण जोतीरावांना तो अनाठायी दिसतो.

**प्राथमिक शिक्षणाची आबाळः-**

ગુજરાત સંશોધન મંડળનું ત્રૈમાસિક
Journal of The Gujarat Research Society
ISSN: 0374-8588
Volume 22 Issue 1, January 2020

हंटर आयोगाला सादर केलेल्या निवेदनात फुल्यांनी मुंबई इलाख्यात त्याकाळी प्रचलित असलेल्या प्राथमिक शिक्षणाबद्दल तीव्र असमाधान व्यक्त केले आहे. प्राथमिक शाळांची संख्या थोडीफार पूर्वीपेक्षा वाढली असली तरी जनतेच्या एकदर गरजेच्या मानाने ती अजूनही अत्यंत तोकडी असल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. ते लिहितात सरकार शिक्षणासाठी खास पट्टी गोळा करते, पण ज्या कामासाठी हा पैसा उभा केला जातो त्यासाठीच तो खर्ची पडत नाही ही खेदजनक परिस्थिती आहे. या इलाख्यातील दर दहापैकी नऊ खेडी किंवा जवळपास दहा लाख मुले- मुली आज प्राथमिक शिक्षणाच्या कोणत्याही सोयीवाचून आहेत. त्यांचे बरेचसे दारिद्रय, स्वावलंबनाचा अभाव, सुशिक्षितांवरचे त्यांचे अवलंबन या सर्व गोष्टी शेतक-यांच्या शिक्षणाची जी भीषण दुरवस्था आहे तिथीच फलश्रृती होत.

देशी प्राथमिक शाळाविषयी अत्यंत कडक शब्दात आपले मत व्यक्त करताना जोतीराव लिहितात. अपु-या पात्रतेच्या बव्हंशी ब्राम्हण जातीच्या शिक्षकांनी उदरनिर्वाहाचा शेवटचा उपाय म्हणून बालवलेल्या या अत्यंत टाकाऊ असतात अन्य क्षेत्रात अपयशी ठरल्यामुळे नाईलाजापोटी ते शिक्षणक्षेत्रात आलेले असतात. देशी शाळेच्या शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची देशात सोयच नाही. पाढे परवचे पाठ करणे, मोडके तोडके मोडी लिहिणे, वाचणे आणि काही धार्मिक उतारे मुखोद्गत करणे यापलीकडे या शाळांमधून काहीच शिकवले जात नाही या शाळांवर व शिक्षकांवर आज होणारा खर्च वायाच जातो. शिक्षक प्रशिक्षित असेल त्याच शाळांना सरकारने अनुदान द्यावे. योग्य शाळांना दिलेली अनुदाने नक्कीच समाजाचे हित करतील.

**शहरात प्राथमिक शिक्षणाचा लाभ :-**

शहरात सुद्धा प्राथमिक शिक्षणाचा लाभ, लेखनोपजीवी ब्राम्हण- प्रभू आणि व्यापारी वर्गानाच होतो. शेतकरी व इतर वर्ग त्याचा फायदा घेऊ शकत नाहीत. त्यांची काही मुले प्राथमिक माध्यमिक शाळांमधून दिसत असली तरी दारिद्रय पोटी ती टिकून राहू शकत नाहीत. गुरे वळणे किंवा तत्सम कामे मिळाली की, पालक या मुलांना शाळेतून काढून टाकतात. यावर उपाय म्हणून जोतीरावांनी अशी मागणी केली आहे की, शाळांची संख्या तर वाढवावीच, शिवाय या मुलांना शिष्यवृत्या, सहामाही किंवा वार्षिक बक्षिसे देऊन त्यांना शिक्षणाची गोडी लावणेही अत्यावश्यक आहे. विशिष्ट वयोमर्यादेपर्यंत 12 वर्षेपर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे, मराठी आणि इंग्रजी नीट अवगत नसल्यामुळे मुसलमान वर्गही शिक्षणवंचित राहिला आहे. त्याच्या भाषेत शिक्षण देणा-या प्राथमिक शाळा फारच कमी आहेत. महारा- मांगांच्या मुलांना जातीय पूर्वग्रहांपायी सर्व शाळांनी दूरच ठेवले आहे. वरिष्ठ जातींच्या मुलांशेजारी त्यांना बसू दिले जात नसल्यामुळे त्यांच्यासाठी ज्या वेगळया शाळा सरकारने काढल्या त्या फक्त मोठ्या शहरांमधूनच आहेत. संपूर्ण पुणे शहरात अशी एकच शाळा आणि तीत फक्त 30 मुले ही स्थिती शासनाला नक्कीच भूषणावह नाही, असे

ISSN: 0374-8588
Volume 22 Issue 1, January 2020

सांगून ज्योतीराव असे सूचवतात की, जिथे जिथे महार मांगांची मोठी वस्ती असेल तिथे त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळांची तजविज केली जावी असे म्हटले.

**स्त्रियांचे आणि शूद्रातिशूद्रांचे शिक्षण :-**

हजारो वर्षे शिक्षणापासून वंचित झालेल्या स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र या वर्गाच्या शिक्षणाकडे शासनाने विशेष लक्ष पुरवावे असे म्हणणारे जोतीराव आज बचावात्मक भेदभाव (प्रोटेक्टिव डिस्क्रिमिनेशन) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तत्त्वाचे या देशातील आद्य पुरस्कर्ते ठरतात. या वर्गांना शिक्षणाची गोडी लागावी. यासाठी त्यांना विशेष प्रलोभने व आकर्षणे दिली जावीत, शिष्यवृत्या आणि बक्षिसे यांची तरतूद करावी, मोफत जेवण, कपडेलत्ते व पुस्तके पुरवावीत, वसतिगृहांची सोय करावी, शिक्षण पूर्ण होताच अग्रक्रमाने सरकारी नौक-या द्याव्यात, अशा अपेक्षा जोतीरावांनी विविध संदर्भात व्यक्त केल्या आहेत. शुद्र शेतक-यांच्या विद्येआड ब्राम्हण येतात. हे जर टाळायचे असेल तर सरकारने ब्राम्हणांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणातच सरकारी हुद्याच्या जागा देऊन बाकी उरलेल्या जागा इतर जातीय हिंदूंना व मुस्लिमांना द्याव्यात, अशीही सूचना जोतीरावानी केली आहे.

'शेतक-यांच्या आसूड' पुस्तकात पुढे ते लिहितात, "शूद्र शेतक-यांचे मुलास विद्वान करण्याकरिता त्यांच्या जातीतील, स्वतः पामारी, कोळपी व नांगर हाकून दाखवणारे शिक्षक तयार करुन, त्यांच्या शाळेत शेतकऱ्यांनी आपली मुले पाठविण्याविषयी कायदा तयार करुन, त्यांच्या शाळेत शेतक-यांनी आपली मुले पाठविण्याविषयी कायदा करुन, प्रथम काही वर्षे त्यांच्या परीक्षा घेण्याकरिता हलक्या इयत्ता करुन, त्यांस ब्राम्हणाच्या मुलांसारख्या पदव्या देण्याची लालूच दाखवून त्यांच्या मुली- मुलांच्या लग्नात लग्नविधी करण्याविषयी परजातीने जुलूम करु नये, म्हणून बंदोबस्त केल्याशिवाय शूद्र गावक-यांची मुले, जी मराठी सहावी इयत्तेसह नांगर, पामर व कोळपी हाकण्याची परीक्षा देऊन सदगुणी निवडतील, त्यास मात्र पाटिलक्या द्याव्यात, म्हणून आमचे दयाळू सरकारने कायदा केल्याबरोबर हजारो शेतकरी पाटिलक्या मिळविण्याचे चूरशीने आपली मुले विद्वान करण्याकरिता मोठ्या आनंदाने शाळेत पाठवतील. दयाळू सरकारने एकंदर सर्व शेतकऱ्यास युरोपियन शेतक-याप्रमाणे विद्यावंत करावे, असेही त्यांनी म्हटले आहे. भूतकाळात ज्यांच्यावर अन्याय झाला. त्यांना इतरांच्या बरोबरीने आणण्यासाठी काही काळ गुणवत्तेबाबत तडजोड करुनही विशेष संरक्षण देण्याचे हे तत्त्व आज सर्वमान्य झाले आहे.

शिक्षणाचा सांधा जनसामान्यांच्या जीवनाशी व त्यांच्या दैनंदिन गरजांशी जोडणे, शिक्षण क्षेत्रातील अभिजनवाद मोडून काढणे, शिक्षणाचा विचार केवळ कार्यक्षम कारकून आणि एकनिष्ठ प्रजाजन निर्माण

ISSN: 0374-8588
Volume 22 Issue 1, January 2020

करण्याचे एक साधन यादृष्टीने न करता अधिक व्यापक व समाजसापेक्ष संदर्भात केला जाणे, पर्यावरणानुरुप शिक्षणाचा आशय ठरवणे, शिक्षण विषयी अग्रक्रम ठरवण्याचा निकष राज्यकर्त्यांची सोय हा असण्यापेक्षा जनजीवनाची निकड हाच एकमेव असणे, प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा काही भाग तरी सक्तीच्या व्यवसायशिक्षणाचा असणे, वरिष्ठ वर्गांना अतिशिक्षित करण्यापेक्षा बहुसंख्य निम्नवर्गाना पुरेसे सुशिक्षित करण्यावर भर देणारी शिक्षणप्रणाली निर्माण करणे, प्राथमिक शिक्षक सार्वत्रिक व सक्तीचे केले जाणे, एवढेच नव्हे तर दारिद्रय, अंधश्रद्धा, उच्चवर्णीयांचे स्वार्थी हितसंबंध असे जे अडसर श्रमिक जनतेच्या शिक्षणाआड येतात ते दूर सारणे, मागावर्गीयांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून विशेष संरक्षणे- प्रलोभने देणे ही जोतीरावाच्या शिक्षणविषयक विचार आणि कार्याची पायाभूत सुत्रे संवेदनक्षम व्हावे, ज्ञानाची क्षितीजे विस्तारावीत आणि तिला प्रतिष्ठेचे व अभिरुचीपूर्ण मानवी जीवन जगणे शक्य व्हावे हे तर त्यांना अभिप्रेत होतेच. पण त्यांच्या मते समाज परिवर्तन किंवा नवमूल्यांवर आधारित नवसमाजनिर्मिती हेच शिक्षणाचे खरे आणि अंतिम प्रयोजन होते. सुशिक्षित व्यक्तीने समाज पविर्तनाला सहाय्यभूत साघनीभूत व्हावे अशी त्यांची अपेक्षा होती, शिक्षणप्रसार मोजण्याचे तेच त्यांचे गमक होते. विद्याप्रसारक संस्थांच्या इमारती किती उंच होतात किंवा विद्यार्थ्यांची संख्या किती अफाट होते या गोष्टींना जोतीरावांच्या दृष्टीने गौण स्थान होते.

शुद्रातिशूद्रांना असे शिक्षण दिले जावे की, जे घेतल्यानंतर सामाजिक समतेच्या लढ्यात त्यांनी अग्रेसर व्हावे. व्यक्तिस्वातंत्र्याचा हक्क त्यांनी संघर्षपूर्वक पदरात पाडून घ्यावा आणि परिवर्तन प्रक्रियेचे नेतृत्व करावे. शिक्षणाची ही ध्येये त्यांच्या अनक स्थितीवादी सहका-यांना मानवणारी नव्हती. फारच मध्यमवर्गीय दृष्टीने ते गरिबांच्या श्रमिकांच्या शिक्षणाचा विचार करीत होते. आपल्या सर्व शाळा संस्थांच्या हवाली करुन जोतीरावांनी जेव्हा निर्णयप्रक्रिया संचालक मंडळाकडे सुपूर्द केली तेव्हा शिक्षणाच्या उद्दिष्टांवरचे मतभेद अधिकाधिक वाढत गेले. बहुमतानुसार निर्णय होऊ लागले. सहकाऱ्यापैकी पुष्कळांचे मत असे होते की, कनिष्ठ वर्गांना फक्त लिहायला वाचायला व आकडेमोड करायला शिकवावे, तर जोतीरावांना मात्र शिक्षणाद्वारे त्या वर्गाची विचारशक्ती जागृत व्हावी, हक्कांचे भान यावे आणि हितहिताचा व सत्य -असत्याचा विवेक त्यांना करता यावा असे फलित अपेक्षित होते. आपले सहकारी अशा शिक्षणापासून समाजाच्या तळपातळीवर संभवणाऱ्या जनजागरणाला बहुधा घाबरत असावेत अशी शंकाही जोतीरावांनी व्यक्त केली आहे.

**प्रचलित शिक्षणः**

ISSN: 0374-8588
Volume 22 Issue 1, January 2020

"प्रचलित माध्यामिक शिक्षण हे सर्वसामान्यांच्या जीवनाच्या दृष्टीने अव्यवहार्य व अयोग्य आहे." असे मत व्यक्त करून जोतीराव म्हणाले, "कारकून आणि शिक्षक निर्माण करणे एवढाच काय तो त्याचा उपयोग, शिक्षक आणि विद्यार्थी हे मॅट्रिक परीक्षेत उगाच गडून जातात. त्या अभ्यासक्रमाला व्यावहारिक स्वरूप नाही. विद्यार्थ्याला, भावी जीवनात समर्थ करील असे ते शिक्षण नसते. जरी प्रवेश परीक्षेकरिता बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देशातील ज्ञानप्रसाराची मर्यादा लक्षात घेता मुळीच महत्त्वाची नाही. तरी ती संख्या सरकारी नोक-यांतील आवश्यकता लक्ष्यात घेता मोठी आहे. असे दिसते. जर शिक्षण सर्वांना सक्तीचे असून सर्वांच्या आवाक्यात असते, तर ही संख्या आणखी मोठी झाली असती; तशी होईल अशी मला आशा आहे.

**उच्च शिक्षणाची व्यवस्थाः-**

उच्च शिक्षणाची व्यवस्था अशा रितीने करावी की, ते घेणे सर्वांना सहज शक्य होईल. आणि मॅट्रिक परीक्षेकरिता नेमलेल्या विषयाची पुस्तके जशी मद्रास व बंगाल येथे सरकारी गॅझेटमध्ये छापतात. तशी मुंबई सरकारने गॅझेटध्ये प्रसिद्ध करावी. असे करण्याने खाजगी विद्यार्थ्यांना उत्तेजन मिळेल आणि ज्ञान प्रसाराच्या दृष्टिने देशाला अधिक साहय होईल,' ही विशेष संरक्षण देण्याचे हे तत्त्व आज सर्वमान्य झाले आहे.

मुंबई विद्यापीठाचा गौरव करून जोतीराव म्हणाले, मुंबई विद्यापीठ खाजगी रितीने शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना परीक्षांना बसावयास देते. हे एक लोकांना मोठे वरदान आहे उच्च शिक्षणाचेही बाबतीत विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून असेच वरदान लोकांना लाभेल, अशी भी आशा करतो. बी.ए. एम.ए. ह्या पदव्याकरिता खाजगीरित्या केलेला अभ्यास विद्यापीठाने मान्य केला तर बरेच तरुण लोक खाजगीरित्या अभ्यास करावयास झटतील, त्यांनी असे केले तर शिक्षण प्रसाराचे पाऊल अधिक पुढे पडेल."

शिष्यवृत्ती देण्याच्या सरकारी पद्धतीविषयी जोतीराव म्हणाले की, शिष्यवृत्ती देण्याची पद्धत अशा रितीने बनवावी की, जिच्यायोगे ज्या वर्गात शिक्षणाची प्रगती झाली नाही, ज्या वर्गातील मुलांना काही शिष्यवृत्या मिळतील. शिष्यवृत्तीकरिता चढाओढ ठेवून शिष्यवृत्ती देण्याची पद्धत जरी तत्वतः न्याय असली तरी त्यामुळे खालच्या वर्गात शिक्षण प्रसाराला हातभार लागणार नाही. ज्यायोगे सुशिक्षित लोकांना सरकारी नोकरी मिळत नाही त्यांना तांत्रिक किंवा व्यावहारिक अशा त-हेचे शिक्षण न मिळाल्यामुळे हाताने कष्ट करण्याचे किंवा दुसरे रोजगाराचे काम करण्यास त्यांचे मन घेत नाही. म्हणून ज्या सुशिक्षित लोकांची भाऊगर्दी बाजारात कमी झाली आहे"

ISSN: 0374-8588
Volume 22 Issue 1, January 2020

इंग्रज सरकारने भारतातील शिक्षण विषयक प्रश्नांसंबंधी चौकशी करून सुधारणा सुचविण्यासाठी सन 1982 मध्ये सर वुइल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. या चौकशी समितीने देशभर फिरून शिक्षण क्षेत्रात काम करणान्या व्यक्ती सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणा-या व्यक्ती यांच्या भेटी घेऊन चर्चा केल्या. मुंबई प्रांतातील अनेकांनी आपली निवेदने सादर केली. पुणे येथील न्यु इंग्लिश स्कुलचे पर्यवेक्षक वा. शि. आपटे, पुण्यातील एक विद्वान रावसाहेब महादेव मोरेश्वर कुंटे यांनी या कमिटीसमोर साक्ष झाली. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी जनतेकडे सोपवावी. असे त्यांनी कमीशनला सांगितले.

जोतीराव फुले यांची साक्ष या कमिटीसमोर झाली त्यांनी या समितीसमोर 12 वर्षापर्यंत किंवा प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे आणि ते मोफत असावे अशी मागणी केली. म्हणजे त्यांनी सार्वत्रिक शिक्षणाची मागणी केली. तळागाळातील लोकांना शुद्र आणि अतिशुद्ध, कनिष्ठ जातीतील मुलांना शिक्षण घेता येईल, त्यामुळे ते विचार करण्यास शिकतील, शेतकरी आणि गरीब कुटुंबातील मुले गुरे राखण्यासाठी, काम करण्यासाठी हवी असतात. त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजले नसल्यामुळे ते मुले शाळेत पाठवायला राजी होत नाहीत. म्हणून प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचे करण्यात यावे. आता प्राथमिक, माध्यमिक शिक्षण आणि विद्यापीठीय शिक्षणाचा फायदा केवळ श्रीमंत व ब्राह्मण वर्गातील मुठभर विद्यार्थ्यांनाच होत आहे. जातीभेदामुळे महार, मांग आणि इतर अतिशुद्रांना शाळेत बसू दिले जात नाही. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची मोठी गैरसोय होत आहे. म्हणून या मुलांच्याकरिता वेगळ्या शाळा सुरू करण्यात याव्या. असे त्यांनी या निवेदनात म्हटले आहे. पुढे या निवेदनात जोतीराव म्हणतात, प्राथमिक शाळेत प्रशिक्षक नेमावेत, त्यांना पुरेसे वेतन देण्यात यावे, म्हणजे ते शिकविण्याचे काम करतील. कनिष्ठ वर्गातील मुलांना शिकविण्यासाठी ब्राह्मण शिक्षक नेमू नयेत. कनिष्ठ वर्गातील शिक्षक नेमावेत. कारण कनिष्ठ वर्गातील मुलांना समरस होऊन शिकवतील. उच्च शिक्षण सर्वांना घेता यावे, अशी व्यवस्था करावी. माध्यमिक शिक्षण हे विद्यार्थ्यास आपले भावी जीवन जगण्यास समर्थ करील. असे असावे असेही त्यांनी म्हटले आहे. शिक्षणासंबंधी जोतीरावांनी मांडलेले विचार किती वस्तुनिष्ठ आहेत? चिंतनशील आहेत? हे प्रत्यक्षात दिसून येते. शंभर वर्षापूर्वी जोतीरावांनी कलेले विचार आजही मार्गदर्शक ठरणारे आहेत. महात्मा फुले यांनी गर्जना करून स्त्री- शूद्रातिशूद्रांना अज्ञानाच्या झोपेतून उठविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी पददलितांना शिक्षणाचा संस्कार दिला. त्यांच्या काळात तसा शिक्षणचा प्रसार झाला नसला तरी, शिक्षणाची ठिणगी पडली होती. म्हणून महर्षी वि.रा.शिंदे, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, महाराजा सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अनेकांनी शूद्रातिशूद्रांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यायला सुरुवात केली.

*ISSN: 0374-8588*
***Volume 22 Issue 1, January 2020***

संदर्भ ग्रंथ :-

1) महात्मा जोतीराव फुले, कीर धनंजय, 2014/1936
2) महात्मा फुले साहित्य एवं आंदोलन संपादक नारके हरि, 2006
3) महात्मा जोतीराव फुले - विरासत और वसा- भोले भास्कर लक्ष्मण - तृतीय संस्करण 2007
4) महाराष्ट्र: समाज आणि संस्कृती (मध्य आणि आधुनिक काल)- डॉ. कुलकर्णी अ.रा. - प्रथम आवृत्ती मे 2008
5) महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ संपादक - कीर धनंजय, मालशे सं.ग. आणि फडके य.दि. सुधारित सहावी आवृत्ती 2006
6) आधुनिक महाराष्ट्राचे उद्गाते प्रा. ठोके मो.नि., 1989
7) फुले - आंबेडकर, डॉ. काचोळे दा.धों, संवेदन प्रकाशन, औरगाबाद, प्रथमा आवृत्ती 1 जुलै 2014